# रा. कृ. कणबरकर लोकशिक्षक

## एन. डी. पाटील : 'रा. कृ. कणबरकर-व्यक्ती व कार्य' गौरव ग्रंथाचे प्रकाशन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १५ : मूल्यांची जोपासना करत समृद्ध आयुष्य जगणारे कुलगुरू रा. कृ. कणबरकर लोकशिक्षक आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ नेते प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी आज येथे केले. आयुष्य कशासाठी वेचायचे याचा शोध लागल्याने कणबरकरांनी कोणत्याही स्थितीत तडजोड केली नसल्याचे त्यांनी सांगितले.

कमला महाविद्यालयात आयोजित 'कुलगुरू रा. कृ. कणबरकर-व्यक्ती व कार्य' गौरव ग्रंथ प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. डॉ. पाटील यांनी कर्मवीर भाऊराव पाटील व कणबरकर यांच्या नात्यातील ओलावा, प्रतिकूल स्थितीत कणबरकर यांनी घेतलेले शिक्षण, त्यांनी समाजाची केलेली सेवा असे अनेक पदर उलगडत उपस्थितांशी संवाद साधला. त्यांच्याच हस्ते गौरव ग्रंथाचे प्रकाशन झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. एन. जे. पवार होते.



कोल्हापूर : **कमला महाविद्यालयात 'कुलगुरू रा. कृ. कणबरकर-व्यक्ती व कार्य' या गौरव ग्रंथाचे शुक्रवारी प्रकाशन झाले. या प्रसंगी ज्येष्ठ नेते प्रा. डॉ. एन. डी. पाटील, बाबासाहेब पाटील, कुलगुरू डॉ. एन. जे. पवार, माजी कुलगुरू रा. कृ. कणबरकर, प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील. (संजय देसाई : सकाळ छायाचित्रसेवा)**

डॉ. पाटील म्हणाले, "चार भिंतींत व भिंतीबाहेर लोकशिक्षणाचे कार्य कणबरकर यांनी केले. मनाला पटेल त्या पद्धतीने काम करणारे कणबरकर एक चालती-बोलती संस्था आहेत. निरक्षर शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या कणबरकरांनी वाट्याला जे येईल ते सोसले. त्यातूनच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार मिळाला. कर्मवीरांच्या रयत शिक्षण संस्थेच्या कऱ्हाडमधील सद्‌गुरू गाडगे महाराज महाविद्यालयात त्यांनी प्राचार्य म्हणून काम केले. त्यानंतर ते कर्मवीरांच्या संमतीने कोल्हापुरात आले आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून काम करताना आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला."

श्री. कणबरकर म्हणाले, "जगण्याचे प्रयोजन योगायोगाने कळत गेले आणि माणसेही मार्गदर्शन करणारी मिळत गेली. कुलगुरू डॉ. अप्पासाहेब पवार यांच्याकडून प्राध्यापक कसा असावा, याचे धडे मिळत गेले. कर्मवीरांकडून मिळालेले तत्त्वज्ञान आयुष्यात उपयोगी पडले. त्यातूनच काम करत गेलो."

कुलगुरू डॉ. पवार म्हणाले, "शिक्षक, प्रशासक व कुलगुरू कसा असावा, याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे श्री. कणबरकर आहेत. ज्या काळात विद्यापीठाला अनुदान गलेलठ्ठ मिळत नव्हते, की तंत्रज्ञानाचा विकास झाला नव्हता, त्या वेळी त्यांनी अनेक आव्हाने सहज पेलली. सत्य, प्रामाणिकपणा व पारदर्शकता या त्रिसूत्रीवर ते कार्यरत राहिले. त्यामुळेच त्यांची लोकमान्य कुलगुरू म्हणून ख्याती आहे."

प्राचार्य डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी, मूल्यनिष्ठा समजून घ्यायची असेल, तर कणबरकर यांचा गौरव ग्रंथ वाचणे आवश्यक असल्याचे सांगितले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, ग्रंथाचे संपादक बाबासाहेब पाटील, प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगचे अध्यक्ष डी. बी. पाटील, प्रा. डॉ. रमेश जाधव आदी उपस्थित होते. डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. जयसिंगराव सावंत यांनी आभार मानले.